जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:- sp.jalgaon@mahapolice.gov.in

## -:प्रेस नोट :-

दिनांक :- २१/०६/२०२६

# " अपघाताचा बनाव उघडकीस; यावल पोलिसांनी खुनाचा छडा लावून ०३ आरोपीतांना केले जेरबंद "

दिनांक १८/०६/२०२६ रोजी रात्री ०२.०० सुमारास इसम नामे उमेश दिलीप परदेशी रा. कोळन्हावी ता. यावल याने त्याचे इतर २ सहका-यांचे मदतीने मयत नामे पवन रविंद्र सोळंके वय-२६ वर्षे रा. कोळन्हावी ता. यावल यास मृत अवस्थेत मोटारसायकलवर आणुन ग्रामीण रुग्णालय यावल येथे दाखल केलेले होते. सदर दिवशी उमेश परदेशी याने फिर्याद देतांना सांगीतलेले होते की रात्री १२.०० वाजेचे सुमारास तो मयत तसेच आणखी इतर २ साथीदारांसह किनगाव येथील राज हॉटेलमध्ये जेवण करुन डांभुर्णी येथे परत जात असतांना डांभुर्णी शिवारात पाठाजवळ त्यांनी लघवीसाठी मोटारसायकल थांबविली असता मयत पवन सोळुंखे हा लघवी करण्यासाठी पायी जात असतांना एका ट्रकने पवन सोळुंखे यास मागील बाजुने धडक दिल्याने त्याचे डोक्यास गंभीर दुखापत होवून तो जागीच बेशुद्ध झाल्याने त्यास ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता त्यास डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले अश्या आशयाचे फिर्याद वरुन यावल पो.स्टे. गुन्हा रजी. नं. २३४/२०२६ BNS कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) सह मोटार वाहन कायदा कलम १३४(अ)(ब), १८४ अन्वये अज्ञात ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला होता

त्यानुषंगाने यावल पोलीस स्टेशनच्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचेकडून अपघाताची प्रथमिक चौकशी तसेच घटनास्थळ पंचनामा करते वेळे अपघाताचे ठिकाणी रक्त मिळून न आल्याने सदर फिर्यादी बाबत संशय निर्माण झाला. सदर प्रकरणी अधिक चौकशी केली असता डांभुर्णी गावचे शिवारात किनगाव-डांभुर्णी रोडपासून सुमारे २०० मीटर अंतरावर हातनूर कॅनॉलमध्ये सिमेंट कॉंक्रीटवर काही संशयित रक्ताचे थारोळे व रक्ताचे डाग मिळून आल्याने व सदर रक्तावर काही ठिकाणी माती टाकल्याचे दिसल्याने संशय अजुन वाढला.

घटनेचे गार्भिर्य लक्षात घेवुन यावल पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्री रंगनाथ धारबळे यांनी आपले अधिपत्याखालील पोलीस अधिकारी/अंमलादार यांचे पथक तयार करुन सदर प्रकरणी तात्काळ सखोल चौकशी करणे बाबत मार्गदर्शनपर सुचना दिल्या त्या अनुषंगाने अपघाताची खबर देणारा उमेश परदेशी व त्याचे मित्रांना पुन्हा विचारपूस केली असता त्यांनी सुरुवातीस विचारपूस दरम्यान सांगीतले की **" मयताचा अपघात झाल्याची त्यांनी खोटी फिर्याद दिलेली होती, प्रत्यक्षात त्या सर्वांनी दिनांक १७/०६/२०२६ रोजी राज हॉटेल येथे दारु पिल्यानंतर ते मयतासह सदर कॅनॉलजवळ गप्पा मारण्यासाठी गेले असता कॅनॉलचे कडेला असलेल्या सिमेंट कॉंक्रीटचे कट्ट्यावर मयत हा पडलेला असतांना त्यास झोप लागून गेली व तो झोपेतच २५ फूट खोल असलेल्या कॅनॉलमध्ये पडून त्याचा मृत्यु झाला, गावातील लोक आमचेवर आरोप करतील म्हणून आम्ही अपघाताची खोटी तक्रार दिली" असा दुसरा बनाव त्यांनी तपासदरम्यान सांगीतला.**

सदर प्रकरणाचा अधिक सखोल तपास सुरु असतांना कॅनॉलचे ठिकाणी जाऊन घटनास्थळाची पाहणी तसेच फॉरेन्सिक व्हॅनचे सहाय्याने मिळालेले रक्त व इतर पुरावे गोळा करण्यात आले त्यावरुन मयतास झालेल्या जखमा ह्या २५ फूट उंचीवरुन पडल्याने झालेल्या नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने, **यावल पोलीस स्टेशनच्या पथकाने परिसरातील डांभुर्णी व कोळन्हावी गावातून गोपनीय माहिती मिळवुन व परिसरातील तांत्रिक विश्लेषणाचे आधारे आरोपी १) उमेश दिलीप परदेशी वय ३२ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. कोळन्हावी ता. यावल जि. जळगाव २) चेतन मोतीराम कोळी वय ३२ वर्षे, व्यवसाय- भाजीपाला विक्री, रा. डांभुर्णी ता. यावल जि. जळगाव ह.मु. शिक्रापूर पुणे ३) लोकेश दिवाकर महाजन वय ३२ वर्षे, रा. डांभुर्णी ता. यावल जि. जळगाव यांचेकडे कसुन कैशल्यपुर्ण चौकशी केली असता, यांनी दिनांक १७/०६/२०२६ रोजी रात्री पवन रविंद्र सोळंके वय-२६ वर्षे रा. कोळन्हावी ता. यावल यास दारु पाजून त्यास सदर कॅनॉलचे ठिकाणी मोटारसायकलवरुन नेवून मयताचे डोक्यात दगडाने मारून त्याचा खून केल्याची तसेच त्याची चप्पल घटनास्थळावरुन उचलून घेऊन रक्ताचे थारोळ्यावर माती टाकून पुरावा नष्ट केल्याची कबुली दिली. त्यामुळे सदर प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०३(१), २३८, २३९, ३(५) अन्वये वाढीव कलम लावून सदर आरोपीतांना अटक करण्यात आलेली आहे.**

सदरची कारवाई ही मा. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक जळगाव व मा. श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक जळगाव यांचे मार्गदर्शनात मा. श्री. अनिल बडगुजर उपविभागीय पोलीस अधिकारी, फैजपूर उपविभाग यांचे नेतृत्वात पो.नि. रंगनाथ धारबळे, सपोनि अजयकुमार वाढवे, पोउनि अनिल महाजन, पोहेकॉ वासुदेव मराठे, पोहेकॉ संदीप सूर्यवंशी, पोना किशोर परदेशी, पोकॉ सचिन पाटील, पोकॉ योगेश खोंडे, पोकॉ ऐजाज गवळी, पोकॉ हितेश बागुल, पोकॉ सागर कोळी, पोकॉ अल्लाउद्दीन तडवी नेमणूक यावल पो.स्टे. या पथकाने उत्कृष्ट व उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

**************************************************************************************************************


यावल पोलीस स्टेशन